# महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी

२३५ पेनिनसुला हाऊस, तिसरा मजला, डॉ.दादाभाई नौराजी रोड,
फोर्ट, मुंबई ४००००१

फोन २२७०४४००,२२७०३०८६ फॅक्स (०२२) २२७०३०८६

E-mail@mchmumbai.org Web site:www.mchmumbai.org


## जाहिर प्रकटन

मुंबई उच्च न्यायालयातील याचिका क्र. ७८४७/२०१४ मध्ये वादीने दाखल केलेला अंतरिम अर्ज १/२०२० च्या सुनावणी दरम्यान दि. २९.१.२०२० रोजी मा. मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांना अनुसरुन वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि. २६.२.२०२० रोजी दिलेल्या सूचनांप्रमाणे पुढील माहिती जनसामान्यांच्या माहितीस्तव प्रसिध्द करण्यात येत आहे.

१) राज्यातील समचिकित्सक व आधुनिक चिकित्सा पध्दतीचे व्यावसायिक यांची नोंदणी व व्यावसायिक गुणवत्ता, नितिमत्ता यांचे नियमन अनुक्रमे महाराष्ट्र समचिकित्सा वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६० व महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम १९६५ या अधिनियमांद्वारे स्थापित महाराष्ट्र होमिओपॅथी परिषद व महाराष्ट्र वैद्यकीय परिषद यांचेद्वारे केले जाते.

२) राज्यातील जनतेला सक्षम आरोग्यसेवा पुरविण्याच्या दृष्टीने भासणारी मनुष्यबळाची कमतरता लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र समचिकित्सा वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६० व महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम १९६५ यामध्ये दुरुस्ती करण्याचा निर्णय घेतला व त्या दुरुस्त्या दि. १३ जून २०१४ रोजी विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहांनी संमत केल्यानंतर मा.राज्यपालांच्या संमतीने महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. २५ जून २०१४ रोजी प्रकाशित करण्यात येऊन त्या उपरोक्त अधिनियमांचा अधिकृत भाग म्हणून महाराष्ट्र राज्यात अंमलात आल्या.

३) उपरोक्त दोन्ही अधिनियमांतील दुरुस्त्यांन्वये महाराष्ट्र होमिओपॅथी परिषदेकडे नोंदणीकृत असणाऱ्या व राज्य शासनाने मान्यता दिलेला महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापिठाचा आधुनिक चिकित्सा पध्दतीच्या औषधशास्त्राचा एक वर्षीय अभ्यासक्रम (CCMP) उत्तीर्ण करणाऱ्या वैद्यकीय व्यावसायिकांना त्यांना प्राप्त ज्ञानाच्या कक्षेत आधुनिक चिकित्सा पध्दतीची औषधे वापरुन व्यवसायास परवानगी देण्यात आली आहे. याकरिता आवश्यक त्या सुधारणा महाराष्ट्र समचिकित्सा वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६० व महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम १९६५ च्या विविध कलमांमध्ये करण्यात आल्या आहेत.

४) उपरोक्त अधिनियमातील दुरुस्त्यांना इंडियन मेडिकल असोसिएशन, पुणे शाखेने ऑगस्ट २०१४ मध्ये मुंबई उच्च न्यायालयात याचिका क्र. ७८४७ द्वारे आव्हान दिले असून याचिका प्रलंबित आहे.

५) नोंदणीकृत समचिकित्सा व्यावसायिकांना त्यांच्या पदवी/पदविका अभ्यासक्रमात मिळालेले प्रशिक्षण तसेच महाराष्ट्र शासनाने विहित केलेला Certificate Course in Modern Pharmacology (CCMP) द्वारे त्यांना प्राप्त झालेले अतिरिक्त प्रशिक्षण, प्रात्यक्षिक व रुग्णालयीन आरोग्य सेवेतील सेवेचा प्रत्यक्ष अनुभव याचा विचार करता CCMP अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण करणारे नोंदणीकृत होमिओपॅथिक वैद्यकीय व्यावसायिक हे दैनिंदिन व्यवसायामध्ये (जनरल प्रॅक्टिस) येणाऱ्या सर्व प्रकारच्या सामान्य आजारांवर स्वतंत्ररित्या उपचार करु शकतात. परंतु शल्यचिकित्सा, वैद्यकीय गर्भपात, प्रसूती शल्यचिकित्सा, अधिसूचित गंभीर आजार या बाबतीत मात्र आवश्यक तेथे केवळ प्राथमिक उपचार करुन रुग्णाला संबंधित तज्ञांकडे पुढील उपचारासाठी पाठविणे अपेक्षित आहे.

६) सदरचे प्रकटन मुंबई उच्च न्यायालयामध्ये प्रलंबित असणाऱ्या याचिका क्र. ७८४७/२०१४ मधील कौन्सिल ने घतेलेल्या विविध मुद्यांस बाधा न येता (without prejudice) जारी केले जात आहे.

ही महिती जनसामान्यांच्या प्रबोधनाकरिता प्रसिध्द करण्यात आली असून CCMP अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या नोंदणीकृत होमिओपॅथिक वैद्यकीय व्यावसायिकांना त्यांच्या व्यवसायाच्या ठिकाणी महाराष्ट्र होमिओपॅथी परिषदेने दिलेल्या नोंदणी प्रमाणपत्रासोबत विद्यापिठाने दिलेला अभ्यासक्रम उत्तीर्ण झाल्याचा दाखला व या जाहिर प्रकटनाची प्रत ठळकपणे अभ्यांगतांना सहज दिसेल व वाचता येईल अशा ठिकाणी लावावी.

(डॉ. नितिन ब. गावडे)
अध्यक्ष
महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी

ठिकाण - मुंबई
दि.- १ फेब्रुवारी २०२१